यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

९ सप्टेंबर २०२४

सूचनापत्र

बीसीए शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राचे नूतनीकरण

बीसीए शिक्षणक्रम राबविणाऱ्या ज्या अभ्यासकेंद्रांची मान्यता संपलेली आहे (३१ मे २०२४) त्या अभ्यासकेंद्रांनी नूतनीकरणाची प्रक्रीया ऑनलाईन पद्धतीने पूर्ण करणे आवश्यक आहे. अनेकदा मुदतवाढ करूनही अद्यापही अनेक अभ्यासकेंद्रांनी नूतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. अभ्यासकेंद्रांच्या विनंतीवरून १४ सप्टेबर २०२४ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याची संधी देण्यात येत आहे. या कालावधीत कोणत्याही कारणास्तव नूतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करू न शकणाऱ्या अभ्यासकेंद्रांना १८-२१ सप्टेंबर या कालावधीत मुख्यालयात येऊन सदर प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. यानंतर नूतनीकरणाची प्रक्रिया बंद करण्यात येईल. नूतनीकरण न केलेल्या अभ्यासकेंद्रावरील विद्यार्थ्यांच्याबाबतीत विद्यापीठ स्वतंत्रपणे निर्णय घेईल. याबाबतचे अभ्यासकेंद्रनिहाय वेळापत्रक १२ सप्टेबरला जाहीर करण्यात येईल व संबंधीत अभ्यासकेंद्रांनाही विभागीय केंद्रांमार्फत कळविण्यात येईल. मुख्यालयात येताना अपलोड करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या सॉफ्ट कॉपी घेऊन यावे.

१. पारंपारिक विद्यापीठाची सात वर्षांची मान्यतापत्रे
२. केंद्र प्रमुख आणि केंद्र संयोजक यांचे बायोडेटा आणि पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक
३. सात मार्गदर्शक प्राध्यापकांचे बायोडेटा आणि पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक
४. तीन सुपयवायझरचे बायोडेटा आणि पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक
५. लॅब असिस्टंटचा बायोडेटा आणि पदवीचे गुणपत्रक
६. सामंजस्य करार
७. संस्थेचा ठराव (रिझोल्यूशन)
८. कव्हरिंग लेटर

बायोडेटा हा विहित नमून्यात टाईप केलेला असणे आवश्यक आहे.
कागदपत्रे तयार करण्यापूर्वी संगणकशास्त्र विद्याशाखेच्या माहितीपुस्तिकेचा अभ्यास करावा.
(https://ycmou.digitaluniversity.ac/WebFiles/SCS%20LSC%20SC%20Inf%20Booklet%20for%20BCA%20-%20April%202024.pdf) Appendix A to F

माधव पळशीकर
प्रभारी संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा